# 'द न्यूज बिज टाईम्स'

दि. २८/८/२०२६ | पिंपरी, महाराष्ट्र, | thenewzbiz@gmail.com | वर्ष - दुसरे | डिजीटल आवृती


# डॉ. डी. वाय. पाटील ए.सी.एस. महाविद्यालय व क्विक हील फाउंडेशन सायबर वॉरियर क्लब तर्फे सायबर जनजागृती कार्यक्रम संपन्न



निगडे, प्रतिनिधी : ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांना वाढत्या सायबर फसवणुकीपासून सुरक्षित ठेवण्यासोबतच त्यांच्या सामाजिक व आरोग्यविषयक गरजांना हातभार लावण्याच्या उद्देशाने निगडे (मावळ) येथे डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपरीच्या क्विक हील फाउंडेशन सायबर वॉरियर क्लब आणि क्विक हील फाउंडेशन अंतर्गत ग्रामीण प्रभाव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' या ब्रीदवाक्याअंतर्गत तसेच यावर्षीच्या माझा डेटा, माझी जबाबदारी ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली होती.

याबाबत बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील यांनी विद्यार्थ्यांना 'सायबर दूत' म्हणून ओळख देण्याची सूचना केली. हा केवळ सायबर जनजागृतीचा उपक्रम नसून, शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबीयांना डिजिटल फसवणुकीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी समर्पित केलेला उपक्रम आहे. ग्रामीण भागात शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिक डिजिटल प्रक्रियांशी जोडले जात असताना केवायसी, ओटीपी, बँक खाते, संशयास्पद लिंक तसेच शासकीय योजनांच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांना अशा फसवणुकीचे प्रकार ओळखण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पीएम किसान योजनेशी संबंधित प्रक्रिया राबविताना अंगणवाडी सेविकांशी संवाद साधून त्यांना केवायसी, ओटीपी, संशयास्पद कॉल व लिंक यांसह विविध सायबर फसवणुकींबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

सायबर सुरक्षेचा संदेश अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी सायबर जनजागृतीपर घोषवाक्ये देत ओटीपी, यूपीआय, केवायसी फसवणूक यांसारख्या प्रकारांपासून सावध राहण्याचे आवाहन केले. नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या डिजिटल व्यवहारांशी संबंधित अडचणी जाणून घेण्यात आल्या. तसेच संशयास्पद व्यवहार किंवा फसवणूक झाल्यास योग्य वेळी मदत घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सायबर सुरक्षेची जाणीव लहान वयातच निर्माण व्हावी, या उद्देशाने निगडे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसमोर सायबर सुरक्षेवर आधारित स्किट सादर करण्यात आले. सुरक्षित व जबाबदार डिजिटल वापराबाबत विद्यार्थ्यांना सोप्या आणि मनोरंजक पद्धतीने माहिती देण्यात आली.

याच संवादादरम्यान गावातील एका विद्यार्थिनीला शाळेत जाण्यासाठी दररोज सुमारे ४ किलोमीटर चालत जावे लागते, ही बाब समोर आली. तिच्या अडचणीची दखल घेत सायबर वॉरियर्स क्लबच्या माध्यमातून तिला सायकल भेट देण्याचा निर्णय घेण्यात आला. सायबर जनजागृतीसोबतच प्रत्यक्ष गरज ओळखून त्यावर कृती केली. निगडे हे प्रामुख्याने आदिवासी व शेतकरी बहुल गाव असल्याने नागरिकांच्या आरोग्याचीही गरज लक्षात घेण्यात आली. गावकऱ्यांसाठी सर्वसाधारण आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच एका ज्येष्ठ नागरिकाच्या मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा खर्च करण्याची जबाबदारी घेण्यात आली. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी गणवेशाचे वाटप करण्यात आले असून, त्यासाठी सायबर समाचार प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने प्रायोजकत्व केले.

यावेळी निगडे, मावळच्या जिल्हा परिषद सदस्या पल्लवी दाभाडे यांची विशेष उपस्थिती होती. निगडे गावचे सरपंच भिकाजी भगवत, उपसरपंच गणेश भांगरे, मुख्याध्यापिका शिवडे मॅडम, एकात्मिक महिला व बालकल्याण विभागाच्या पर्यवेक्षिका आशा कुंजीर, क्लबचे समन्वयक प्रा. सत्यवान कुंजीर यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक करत भविष्यात पुन्हा गावात येऊन अशा उपक्रमांचे आयोजन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. ग्रामीण भागातील मुलांमध्ये आणि नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत सातत्याने जनजागृती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमाला शाळेने आणि ग्रामस्थांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कामाला मिळालेल्या विश्वासाची पावती ठरला.

क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांच्या प्रेरणादायी नेतृत्वातून आणि क्विक हील फाउंडेशनचे सह-संचालक अजय शिर्के यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने सायबर वॉरियर्स क्लबच्या सायबर जनजागृतीच्या कार्याला व्यापक दिशा मिळत आहे. हे डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाचे चेअरमन पी. डी. पाटील, सचिव सोमनाथ पाटील, प्राचार्य डॉ. रणजित पाटील, सायबर वॉरियर्स क्लबचे शिक्षक समन्वयक प्रा. सत्यवान कुंजीर यांच्या मार्गदर्शनामुळे हा उपक्रम ग्रामीण भागापर्यंत पोहोचविणे शक्य झाले.

सायबर वॉरियर्स क्लब आणि क्विक हील फाउंडेशनच्या सायबर सुरक्षेच्या कार्याला ग्रामीण समाजाच्या प्रत्यक्ष गरजांशी जोडण्याचा प्रयत्न म्हणजे ग्रामीण प्रभाव उपक्रम. सायबर सुरक्षा ही केवळ मोबाईल किंवा इंटरनेटपुरती मर्यादित नसून ती माणसांच्या सुरक्षिततेशी जोडलेली आहे. त्यामुळे ज्या समुदायापर्यंत सायबर सुरक्षेची माहिती पोहोचणे आवश्यक आहे, हे तिथे प्रत्यक्ष जाणे आणि ज्या ठिकाणी गरज दिसते तिथे शक्य तेवढा हातभार लावणे, हीच सामाजिक जबाबदारी मानून पुढील काळातही 'ग्रामीण प्रभाव उपक्रम' च्या माध्यमातून अधिकाधिक शेतकरी, ग्रामीण कुटुंबे आणि गरजू समुदायांपर्यंत पोहोचण्याचा निर्धार करण्यात आला.